


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९४ ●शनिवार, दि.२४ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






# नाकाने वांगे सोलणारी व्यवस्था शेळपटली; 'फाटे' पूढे गोंडा घोळत बसली

## जीएसटी अधिकारी जाधवर मृत्यू प्रकरणात कावतांची हतबलता बीड ने पाहिली

**बीड । प्रतिनिधी**

कडक शिस्तीचे कर्तव्यदक्ष, राजकीय दबावाला बळी न पडता काम करणारे म्हणून प्रतिमा असलेले पोलीस अधीक्षक नवनीत कांवत जीएसटी अधिकाऱ्याच्या आत्महत्ये प्रकरणात हतबल असल्याचं त्यांच्या कार्यपद्धतीला फाटेने फाट्यावर मारल्याचं बीडच्या जनतेने पाहिलं. जेवढी बीडमध्ये इज्जत कमावली ती मूदीराज च्या नादी लागून आमदाराच्या दबावा खाली येऊन मातीत घातली. जाधवर आत्महत्याप्रकरणी सात दिवसानंतरही कुटुंब एसपींची भेट घेतं. बीड ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर धरण देतं. तरीही गुन्हा दाखल करायला वेळ घेतला जातो.एवढा शेळपटलेला कारभार सर्वसामान्य जनतेला काय न्याय देणार हा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. आपल्याच महतीचा डंका वाजवायचा कायदा सुव्यवस्था निर्माण केली म्हणून सांगायचं पण वास्तव पाहतांना मात्र धृतराष्ट्रासारखी आंधळी भूमिका घ्यायची हीच पोलीस अधीक्षकांची कर्तव्यदक्षता असल्याचे चित्र जिल्ह्यात तरी पाहायला मिळत आहे.

सचिन जाधवर या जीएसटी अधिकाऱ्याचा संशयास्पदरीत्या आठ दिवसापूर्वी मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह कपिलधार वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कमानीजवळ कार मध्ये आढळला. शवविच्छेदन करण्यासाठी घेऊन जात असताना त्यांच्या खिशात पोलिसांना सुसाईड नोट आढळली. यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्याच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचं तसेच प्रदीप फाटे या अधिकाऱ्याचं नाव त्यांनी मृत्यूपूर्वी लिहिलं होतं. घटना घडल्याच्या दिवशीच त्यांची पत्नी मयुरी सचिन जाधवर गुन्हा दाखल करण्यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्यात आल्या. ▶ उर्वरित पान २ वर



### ● एस पी साहेब.!

प्रामाणिक कर्तव्यदक्ष जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांच्या कुटुंबीयांची ही वाताहात तुम्ही व तुमचे पोलीस ठाणे करीत असतील तर सर्वसामान्य गोरगरिबांचं काय ? पोलीस अधीक्षक धुतल्या तांदळासारखे पण भातात लागणाऱ्या खड्यासारखे असून जनतेला उपयोग काय ? तुमच्या आधुनिकीकरणाचा जनतेला उपयोग काय ? मूदीराज सारखा अधिकारी तुमचा ऐकत नाही काय ? राजकीय दबावाला बळी पडणारे तुम्हीही निघालात काय ? माध्यमावर जाधवर आत्महत्या प्रकरणात छापून आलेल्या घटना वर तुमचं लक्ष नाही काय ? एवढ्या मोठ्या घटनेवर तुमचं लक्ष नाही तर गोरगरिबांचा काय ? अवैध धंदे नाकावर टिच्चून चालू आहेत त्याचं काय ? जाधवर कुटुंबीयांना न्याय मिळणार का ? कायदा असाच फाट्यावर मारला जाणार का ? यासारखे अनेक प्रश्न जाधवर कुटुंबासह सर्वसामान्य जनतेकडून विचारले जाऊ लागले आहेत.

## आष्टीत वाळू माफियांचा धुमाकूळ; कर्मचाऱ्यांवर हल्ला करत तहसीलमधून जप्त केलेला टेम्पो पळवला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी तहसील कार्यालयातून वाळू माफियांनी चक्क जप्त केलेला वाळूचा टेम्पो पळवून नेल्याची खळबळजनक घटना गुरुवारी रात्री घडली. तहसीलदार वैशाली पाटील या रजेवर जाताच संधी साधून ६ ते ८ जणांच्या टोळीने कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करत हा प्रताप केला आहे. कायद्याचे रक्षण करणाऱ्या तहसीलच्या आवारातच ही घटना घडल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तहसीलदार वैशाली पाटील यांनी काही दिवसांपूर्वी अवैध वाळू वाहतूक करणारा एक टेम्पो पकडून तहसील कार्यालयात लावला होता. गुरुवारी वैशाली पाटील रजेवर गेल्या आणि प्रभारी तहसीलदार म्हणून विनोद रणविरे यांनी पदभार घेतला. रात्री ८:३० च्या सुमारे ८ वाळू माफिया तहसील कार्यालयाच्या पाठीमागील भिंतीवरून आत शिरले. त्यांनी तिथे कर्तव्यावर असलेल्या दोन कोतवालांना धक्काबुक्की करत हुज्जत ▶ उर्वरित पान २ वर

## ना.अजितदादांकडून बीडकरांची अपेक्षापूर्ती

### आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीनुसार बीड शहरातील रस्त्यांना २२ कोटी रुपयांचा निधी

**बीड । प्रतिनिधी**

ना.अजितदादा पवार यांनी पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर जिल्ह्यात विकासाचे अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. नगर पालिका निवडणुकीत अजितदादा पवार यांनी बीडकरांना विकासावर मत मागितले आणि बीडच्या सुजान जनतेनेही त्यांच्या शब्दाला मान दिला. आता अजितदादा पवार यांनीही बीडकरांची अपेक्षापूर्ती करण्यास सुरुवात केली आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड




शहरातील जनतेचे जिव्हाळ्याचे रस्त्याचे प्रश्न ना.अजितदादा पवार यांच्यासमोर मांडल्यानंतर शहरातील विविध रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी आणि इतर विकास कामांसाठी २२ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून हाती घेण्यात आलेली ही विकास कामे लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. बीड शहरातील विकास कामांना निधी मंजुर केल्याबद्दल नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल यांच्यासह शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी ना.अजितदादा पवार व आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. अनेक वर्षांपासून बीड शहरावर राज्य करणाऱ्या ▶ उर्वरित पान २ वर

## ईशान किशनने ठोकले 'रेकॉर्डब्रेक' अर्धशतक, वर्ल्डकपपूर्वी सूर्या तळपला! टीम इंडियाचा ७ गडी राखून विजय



**वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत टीम इंडियाने सलग दुसऱ्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला आहे. रायपूरमधील शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि ईशान किशन यांच्या तुफानी खेळीच्या जोरावर भारताने हा सामना ७ विकेट्सने जिंकला. या विजयासह टीम इंडियाने मालिकेत २-० अशी भक्कम आघाडी घेतली आहे. न्यूझीलंडकडून टिम सीफर्ट आणि डेव्हन कॉनवे यांनी डावाची सुरुवात केली. दोघांनीही आक्रमक फलंदाजी करत संघाला वेगवान सुरुवात करून दिली, मात्र ही जोडी मोठी भागीदारी उभारू शकली नाही. ▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अमोल सातपुते यांची निवड

### सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आपल्या पदाच्या माध्यमातून सोडवणार: अमोल सातपुते

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले यांच्या आदेशानुसार बीड तालुक्यातील बाभळवाडी येथील युवा नेतृत्व अमोल सातपुते गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात अग्रेसर आहेत सर्वांच्या अडीअडचणीला धावून जाणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची पिंपळनेर सर्कल मध्ये ओळख आहे. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे ध्येय आणि उद्देश डोळ्यासमोर ठेवून पोलिसांचे विविध समस्या सोडवण्यासाठी ही संघटना राज्यामध्ये सक्रिय आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैय्या दुबाले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र ▶ उर्वरित पान २ वर

## आदिती तटकरेंची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी मोठी घोषणा, एका कॉलवर प्रश्न सुटणार




**मुंबई । प्रतिनिधी**

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी घोषणा केली आहे. लाडक्या बहिणींच्या शंकांचं निरसन करण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक १८१ जारी करण्यात आला आहे. लाडकी बहिणींनी आवश्यकता असल्यास या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असं आदिती तटकरेंनी म्हटलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची e-KYC प्रक्रिया करत असताना काही कारणास्तव चुकीचा पर्याय निवडल्याने लाभ स्थगित झाल्याच्या काही तक्रारी विभागास प्राप्त झाल्या आहेत. या आणि योजनेशी संबंधित इतरही तक्रारींचे, शंकांचे फोन कॉलवर निवारण करण्यासाठी १८१ या महिला हेल्पलाइन नंबरवर मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत संबंधित कॉल ऑपरेटर्सना योग्य ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे. योजनेशी संबंधित सर्व तक्रारींचे व शंकांचे निरसन १८१ या हेल्पलाईन नंबरवरून करण्यात येणार आहे. तरी, सर्व लाडक्या बहिणींनी आवश्यकता भासल्यास या सुविधेचा लाभ घ्यावा, असं आदिती तटकरेंनी म्हटलं. अंगणवाडी ▶ उर्वरित पान २ वर

## बाळासाहेबांच्या १०० व्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री शिंदेंकडून नव्या आरोग्य अभियानाची घोषणा




**मुंबई । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे (यांची शुक्रवारी २३ जानेवारी रोजी १०० वी जयंती. यानिमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित शिवसेनेचे मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी कुलाबा येथील रिगल चित्रपटगृहाजवळील बाळासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तयानंतर एक पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी मुंबई महापालिकेच्या वतीने शासन आपल्या दारीच्या धर्तीवर बाळासाहेब ठाकरे आरोग्य आपल्या दारी अभियान राबविणार असल्याची सुद्धा घोषणा केली. एकनाथ शिंदे यांनी म्हटलं की, ' आज बाळासाहेबांचा जन्मदिन असून २३ जानेवारीला वेगळं महत्त्व ▶ उर्वरित पान २ वर

## प्रभाग क्रमांक 7 मध्ये 'आयुष्मान भारत कार्ड'चे मोफत वाटप 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांची सुवर्णसंधी

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देणाऱ्या 'आयुष्मान भारत कार्ड'साठी नोंदणी आणि वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

**शिबिराची माहिती:**
**तारीख: २४, २५ आणि २६ जानेवारी २०२६. वेळ: सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:००**
**ठिकाण : द्वारकाधीश भवन, धोंडिपुरा, बीड.**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी, नागरिकांना खालील कागदपत्रे आणणे आवश्यक आहे: आधार कार्ड, ऑनलाइन रेशन कार्ड, मोबाईल नंबर (शक्यतो आधार कार्डशी लिंक केलेला). नगर सेवक जगदीश फुलचंद गुरखुदे व द्वारकाधीश मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम फुलचंद गुरखुदे व नगर सेवक सागर अरुणराव देशपांडे यांच्या ▶ उर्वरित पान २ वर

## बीड जि. प. प्रशासनाला अखेर जाग

### 'अतिरिक्त कामकाज'च्या नावाखालील १५० प्रतिनियुक्त्या रद्द

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारावर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला जाग आली असून, अतिरिक्त कामकाज या गोंडस नावाखाली करण्यात आलेल्या तब्बल १५० हून अधिक प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहणासाठी येणाऱ्या पालकमंत्र्यांसमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती



अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिल्यानंतर, प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या आधीच याची दखल घेतली. दि. २२ जानेवारी रोजी प्रदीप काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद बीड यांनी सर्व विभागप्रमुखांना लेखी आदेश देत अतिरिक्त पदभार तात्काळ कमी करून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी पूर्णवेळ रुजू करून घ्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. आदेश न पाळल्यास जबाबदारी निश्चित- या संदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि सामान्य प्रशासन विभागाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करत दि. २३ जानेवारीपासून संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदस्थापनेवर कार्यमुक्त न केल्यास विभागप्रमुख व सहाय्यक, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. मूळ पदस्थापनेवर रुजू होईपर्यंत वेतन रोखण्याची मागणी डॉ. ढवळे यांनी मागणी केली आहे की, जोपर्यंत अतिरिक्त कामकाज पाहणारा कर्मचारी आपल्या मूळ पदस्थापनेवर ▶ उर्वरित पान २ वर

## बीड मधील पोलीस पाटील भरती २२ फेब्रुवारीपासून सुरू

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षापासून रि असलेल्या आणि तांत्रिक कारणामुळे रखडलेल्या पोलीस पाटील भरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन या भरती प्रक्रियेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले असून, येत्या २२ फेब्रुवारी रोजी लेखी परीक्षा होणार आहे. १९ जानेवारी ▶ उर्वरित पान २ वर



# युवा शक्ती, शिक्षण व्यवस्था आणि समस्यांचे ओझे


शिक्षण ही या जगातील सर्व मानवांसाठी उपलब्ध असलेली एक अमूल्य संधी आहे, जी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक उच्च पदासाठी, प्रत्येक क्षमतेसाठी आणि प्रत्येक विकासासाठी प्रवेश प्रदान करते. शिक्षणच एखाद्या व्यक्तीला इच्छित असलेले प्रत्येक ध्येय साध्य करण्यास सक्षम करते. यासोबतच, शिक्षणावर मानवाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी देखील आहे. शिक्षणामुळे माणसाला चांगले जीवन जगण्याची आणि जीवनात येणाऱ्या समस्या सोडवण्याची ताकद मिळते. शिक्षण केवळ मानवी मूल्यांना परिष्कृत करत नाही तर आपल्या कलात्मक कौशल्यांना देखील वाढवते. आजच्या स्पर्धात्मक युगात ते आपल्याला अधिक कार्यक्षम बनण्यास मदत करते. ते आपल्याला प्रगतीसाठी प्रेरणा देते आणि सतत प्रगतीच्या मार्गावर जाण्यास मार्गदर्शन करते. माणूस आपल्या जीवनासाठी अशाच शिक्षणाची कल्पना करतो जे त्याचे जीवन यशस्वी आणि अर्थपूर्ण बनवते. प्रत्येक मानवाला शिक्षणाचा समान अधिकार आहे आणि जगातील प्रत्येकाला शिक्षणाचा हा अधिकार मिळाला पाहिजे जेणेकरून ते त्यांचे जीवन सुधारू शकतील, हाच शिक्षणाचा देखील उद्देश आहे. जगातील ज्या देशांना शिक्षणाची गुणवत्ता आणि महत्त्व समजले आहे, ते देश आज समृद्ध राष्ट्रांमध्ये गणले जातात, लहान देशही शिक्षणाच्या गुणवत्तेच्या बळावर विकसित होऊन उन्नत झाले आहेत. युनेस्कोने २०२६ च्या आंतरराष्ट्रीय शिक्षण दिनाची अधिकृत थीम शिक्षण निर्माण करण्यासाठी तरुणांची शक्ती अशी घोषित केली आहे. देशातील वाढती आर्थिक असमानता समाजात मोठी दरी निर्माण करत आहे, विकासकामांना अडथळा आणत आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक सर्वेक्षण अहवाल, युथ पल्स २०२६: नेक्स्ट जनरेशन व्हिजन फॉर अ चेंजिंग वर्ल्डच्या निष्कर्षांनुसार, ४८.२ टक्के प्रतिसादकर्त्यांनी वाढती आर्थिक असमानता हे सर्वात मोठे संकट म्हणून ओळखले. या सर्वेक्षणात १४४ देशांनी भाग घेतला. ५७ टक्के तरुणांनी आर्थिक चिंता हे तणावाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले. ५७.२ टक्के तरुणांनी रोजगार निर्मिती किंवा उपलब्धतेला गरज म्हणून प्राधान्य दिले, तर ४६.१ टक्के तरुणांनी परवडणाऱ्या आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता ही एक गरज मानली.

देशातील बेरोजगारीची व्याप्ती आपल्या सर्वांना माहिती आहे. परंतु दशकांपासून रिक्त पदे न भरल्याने व्यवस्था आणि कार्यपद्धती कमकुवत होते. उदाहरणार्थ, आपल्या महाराष्ट्रातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २५८ प्राध्यापक पदांची मंजूर संख्या आहे. सध्या फक्त ८६ पदांवर प्राध्यापक कार्यरत आहेत. उर्वरित ६६ टक्के पदे रिक्त आहेत, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर थेट परिणाम होत आहे. ही परिस्थिती केवळ एका विद्यापीठापुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आणि इतर काही राज्यांमध्येही अशीच परिस्थिती आहे. अनेक राज्यांमधील शिक्षण विभागाची स्थिती खूपच भयानक आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये, शिक्षण विभागातील घोटाळे वारंवार समोर येतात. भ्रष्टाचार, परीक्षेचे पेपर फुटणे, बनावट कागदपत्रे, बनावट भरती, परीक्षेसाठी बनावट उमेदवार आणि बनावट पदव्या खरेदी हे सर्व उघड होत आहेत. सध्या महाराष्ट्रात शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत आहे. हे सर्व शिक्षणाच्या पवित्र व्यवसायाला कलंकित करते आणि देशाच्या सध्याच्या आणि भावी पिढ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

देशातील अनेक राज्यांमधील खाजगी शैक्षणिक संस्था आणि सरकारी शाळांमध्ये मोठी तफावत आहे आणि कालांतराने ही तफावत झपाट्याने वाढत आहे. गेल्या दशकात (सुमारे २०१४-२०२४), भारतात अंदाजे ९०,००० सरकारी शाळा बंद झाल्या आहेत आणि या काळात, सरकारी आकडेवारी आणि युनेस्कोच्या अहवालाच्या मते, भारतात खाजगी शाळांची संख्या अंदाजे ४२,९४४ ने लक्षणीयरीत्या वाढली आहे, दर्जेदार शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार नोकरी किंवा व्यवसायाची उपलब्धता, या तीन गोष्टी मानवांना सहज उपलब्ध असाव्यात. भेदभाव किंवा आर्थिक असमानता कधीही यासाठी अडथळा ठरू नये. प्रत्यक्षात, देशाचे संपूर्ण भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम आणि जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. शिक्षणाद्वारे, लोक मूल्ये, ज्ञान, कौशल्ये प्राप्त करतात, बुद्धिमान नागरिक बनतात आणि अशा प्रकारे देश आणि जगाला विकासाचा मार्ग दाखवतात. आपल्यासमोर विकसित देशांचे उदाहरण आहे, ऑलिंपिकसारख्या जागतिक स्तरावरील खेळांमध्ये, लहान देश पदकतालिकेत अव्वल स्थानावर असतात. ज्या देशांनी प्रगती केली आहे त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर हे साध्य केले आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.

**– डॉ. प्रीतम भी. गेडाम**

# महाराष्ट्र भूषण बाळासाहेब ठाकरे



देशाच्या राजकारणात जसे अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, गोपीनाथ मुंडे आततदी मंडळी झाली ;तसे महाराष्ट्रात शिवसेनाप्रमुख.

शिवसेनाप्रमुख बाळ केशव ठाकरे यांचा जन्म २३जानेवारी. झाला.लहानपणापासून त्यांना कलेची आवड होती.एका इंग्रजी दैनिकात ते व्यंगचित्रकार म्हणून काम करत होते.मुंब ती राहत असताना मराठी माणसाची व्यथा पाहून बाळासाहेब उद्विग्न झाले.बाळासाहेबांची मराठी माणसांविषयीची तळमळ पाहून मराठी माणसे त्यांच्याभोवती गोळा झाली. त्यातलेच मनोहर पंत जोशी,छगन भुजबळ इत्यादींनी शिवसेना नामक संघटना १९जून१९६६रोजी स्थापन केली.

मराठी माणसांच्या हक्कासाठी शिवसेनाप्रमुखांच्या नेतृत्वाखाली मुंबई नि महाराष्ट्रात अनेक लढे दिले.त्यात त्यांना यशही मिळाले.१९९५साली भाजपच्या साथीने महाराष्ट्रात शिवसेनेच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले.मनोहर जोशी मुख्यमंत्री, गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्रीझाले.

सन्माननीय बाळासाहेब ठाकरे हे शेतकरी वर्गाप्रती कळवळा असलेले नेते होते.त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल व्हावा असे त्यांना वाटते होते.मोफत वीज मिळावी मिळावी (शेतीसाठी) म्हणून त्यां नी प्रयत्न केले.एका निवडणूकीच्या तोंडावर त्यांनी तशी घोषणा केली होती ;पण शेतकरी त्या घोषणेला भुलला नाही.जनमत विरोधात गेले.

बाळासाहेब जयपराजयाने खचले नाहीत. शेवटच्या श्वासापर्यंत मराठी माणसाचे संघटन मजबूत केले.त्यांच्या काळात छगन भुजबळ, नारायण राणेंचे बंड झाले तरीही मराठी माणसाची वज्रमूठ कायम राहिली!



**– नामदेव लोंढे ८६६९८२६०५८**

◆ पान १ वरून पुढे...

## नाकाने वांगे...

त्यावेळी ठाणे प्रमुख मूदीराज यांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. वाटलं नंतर तरी गुन्हा दाखल होईल.मयुरी जाधवर दुःखात आहेत म्हणून कदाचित मूदीराज मधली माणुसकी जागी असेल म्हणून झाला नसेल असं वाटलं. त्यानंतरही मयुरी जाधवर व त्यांचे नातेवाईक वारंवार गुन्हा दाखल करण्यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्याचे उंबरे झिजवत बसले. पण ठाणे प्रमुख मूदीराज यांना पाझर फुटलाच नाही. माणुसकीचं दर्शन झालच नाही. सुसाईड नोट मध्ये ज्या प्रदीप फाटे नावाच्या अधिकाऱ्याचं नाव आढळून आलं त्या फाटेला बोलावून घेत विचारपूस करण्याचा फार्स केला गेला. तपास होत नाही तोपर्यंत बीड सोडायचं नाही असं त्याला सांगितलं असल्याचं पोलीस सांगू लागले. या सुसाईड नोट मध्ये जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांनी काय लिहिलं आहे कोणाकोणाची नाव आहेत याची माहिती कुटुंबीयांना देणं गरजेचं होतं. पण ती देखील मोदीराज ने दिली नाही.कायद्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असं म्हणत आरोपी पुढे गोंडा घोळण्याचे काम केलं गेलं. न्यायासाठी मयुरी जाधवर यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची आठ दिवसानंतर आज भेट घेतली. काळीज पिळवटून टाकेल अशी दर्द भरी कहानी एसपींना सांगितली. हीच कहाणी मयुरी जाधववर यांनी माध्यमांसमोरही सांगितली गेल्या एक महिन्यापासून ते प्रचंड मानसिक तणावात होते, मला ऑफीसचं टेन्शन आहे असे ते सांगायचे. एवढेच नव्हे तर या घटनेच्या ८-१० दिवसा पुर्वी माझ्या मुलाचे शाळेतून अपहरण करण्याचा प्रयत्न झाल्याचेही जाधवर यांच्या पत्नीने माध्यमांना सांगितले. ऑफीसच्या बाहेर सुध्दा एका इनोव्हा गाडीला धक्का लागल्याच्या कारणावरून शिवीगाळ झाली होती, एवढेच नव्हे तर थांब तुला बघतो अशी धमकी दिल्याचा दावा देखील जाधवर यांच्या पत्नीने केला. अशा घटनांमधुन त्यांना जाणिवपुर्वक मानसिक त्रास दिला गेला. यामागे नेमकं काय होतं ? याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यालयात नेमकं काय सुरू होतं ? याचाही तपास होणे गरजेचे असल्याच्या त्या म्हणाल्या. प्रदिप फाटे व कार्यालयातील त्याच्यासोबत आणखी दोन-तीन लोकं आहेत. त्यांची सुध्दा सखोल चौकशी झाली पाहिजे. सुसाईड नोटमध्येही प्रदिप फाटे याच्यासह त्याच्यासोबतचे कर्मचारी असा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले.

मुलाच्या अपहरणासारखे धक्कादायक खुलासे मयुरी जाधवर यांनी नवनीत कावत यांच्यासह माध्यमांसमोर केले असले तरी फारसा फरक पडला नाही. या संदर्भात सुसाईड नोट सोबतच पोस्टमार्टम रिपोर्ट मिळावा अशी मागणी देखील मयुरी यांनी केली. या प्रकरणात गुन्हा दाखल व्हावा यासाठी नातेवाईकांनी पुन्हा ग्रामीण पोलीस ठाण्याकडे येऊन विनंती अर्जव केले. पण मूदीराज खुर्चीवर स्थितप्रज्ञपणाने नातेवाईकांकडे पहात बसले. पाषाणाला ही पाझर फुटला असता पण ठाणे प्रमुखाला पाझर फुटलाच नाही. या प्रकरणात नुसता गुन्हा दाखल करण्यात येईल असं सांगून वाटी लावण्याचा वारंवार प्रयत्न त्यांनी केला. नातेवाईकांनी दुपारपासून ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडला. रात्री साडेआठ पर्यंत या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता नातेवाईक मात्र ठाण मांडून तिथेच होते. याची भनक एसपींना लागली नाही का? एसपींनी पोलीस ठाणे आधुनिक करायचे म्हणून गाजावाजा केला.पण पीडित कुटुंब ठिय्या मांडून बसलय ही बाब एसपीना कशी कळाली नाही.

## आष्टीत वाळू...

.घातली. माफियांनी जप्त केलेला टेम्पो चालू करून तो पळवण्यास सुरुवात केली. यावेळी कर्मचाऱ्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. माफियांच्या या दहशतीमुळे कर्मचारी बाजूला झाले आणि त्यांनी टेम्पो पळवून नेला. माफियांचा दुसरा एक ट्रक पळवण्याचा प्रयत्न मात्र फसला. या सर्व घटनेचा थरार तहसील कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची माहिती तात्काळ नायब तहसीलदार आणि जमाबंदी विभागाला देण्यात आली आहे. प्रभारी तहसीलदार विनोद रणविरे यांनी या घटनेला दुजोरा दिला असून, संबंधित गुंडांवर कठोर गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिसांना पत्र देण्यात येणार असल्याचे सांगितले. आता या प्रकरणातील आरोपींना पोलीस कधी बेड्या ठोकतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ना.अजितदादांकडून...

राज्यकर्त्यांनी बीडकरांना रस्ते, नाल्या, पथदिवे अशा मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवले. बीडकरांचे साध्या-साध्या गोष्टींसाठी हाल होत असताना सत्ताधारी मात्र त्यांच्याच धुंदीत होते. बीडच्या सुजान जनतेने नगरपालिका निवडणुकीत पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या शब्दावर आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत सत्ताधाऱ्यांची धुंद उतरवली. आता ना.अजितदादा पवार आणि आ. विजयसिंह पंडित हे देखील बीडच्या जनतेला निवडणुकीत दिलेल्या शब्दांना जागत असल्याचे दिसत आहेत. नगर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला भरघोस विजय देणाऱ्या बीडच्या जनतेला निकालानंतर अवघ्या महिनाभरात विविध विकास कामांसाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून २४ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. लवकरच या कामांची निविदा प्रक्रिया करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. बीड शहरातील विकास कामांना निधी मंजुर केल्याबद्दल नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, अमर नाईकवाडे, शेख निजाम, मुजीबभाई, संजय उडाण, सादेक अली, बाळासाहेब गुंजाळ, अशफाक इनामदार, भैय्या मोरे, रणजित बनसोडे, जैतुल्ला खान, प्रमोद शिंदे, जकी सौदागर, शेख बिलाल, महेश धांडे, मनोज गोडसे, दत्ता जाधव, शेख खय्युम, वाजेद कुरेशी, विश्वनाथ चक्रे यांच्यासह शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी ना.अजितदादा पवार व आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

ही होणार कामे- बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते बशीरगंज चौक पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १२५ लक्ष रु., जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - २०० लक्ष रु., जिजामाता चौक ते स्पोर्टस् कॉम्प्लेक्स पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १०० लक्ष रु., राजुरी वेस ते कबाड गल्ली, माळीवेस पोलीस चौकीपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - २०० लक्ष रु., बार्शी रोड ते लेंडीनाला पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - २०० लक्ष रु., बीड शहरातील लेंडीनाला ते कौसर चौक ते बिंदुसरा नदीपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १२५ लक्ष रु., बारकुल हॉस्पिटल ते तहसिल कार्यालया पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ९० लक्ष रु., नरसोबा नगर ते माऊली हॉस्पिटलपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १५० लक्ष रु., चक्रधर नगर येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १०० लक्ष रु., कॅनॉल रोड ते शिंदेनगर फेज १ मध्ये सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १०० लक्ष रु., खंडेश्वरी देवी मंदिर ते खिंड रस्त्यापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - १०० लक्ष रु., कॅनरा बँक कॉलनी येथे हनुमान मंदिरा पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ७० लक्ष रु., प्रेरणा कॉलनीमध्ये श्री.अकोलकर यांचे घर ते पिठाच्या गिरणी पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ६० लक्ष रु., हनुमान नगर येथे श्री.हातागळे यांचे घर ते श्री.गालफाडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ६० लक्ष रु., हनुमाननगर येथील समाजमंदिर ते श्री.जोगदंड यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ६० लक्ष रु., बलभीमनगर येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ६० लक्ष रु., नगर रोड ते ऑफिसर कॉलनी पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ६० लक्ष रु., जुना धानोरा रोड ते श्री.काळे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ५० लक्ष रु., जुना धानोरा ते पिंगळे डेअरी फार्मपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ५० लक्ष रु., पवनसुत मंगल कार्यालयाच्या मागील बाजूस सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे. ५० लक्ष रु., प्रियदर्शनी बालउद्यानच्या बाजूला वाहनतळ बांधकाम करणे - ५० लक्ष रु., शिवाजी नगर येथे श्री.सतिष जाधव ते श्री.शिंदे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे - ५० लक्ष रु., नागसेन बुध्दविहार नुतणीकरण करणे - २५ लक्ष रु., विविध ठिकाणी सोलार मिनी हायमास्ट बसविणे - १०० लक्ष रु.

## ईशान किशनने....

संघाचा स्कोअर ४३ धावांवर असताना डेव्हन कॉनवे बाद झाला. हर्षित राणाने त्याला माघारी धाडले. कॉनवेने अवघ्या ९ चेंडूमध्ये १९ धावा केल्या. त्यानंतरच्या ओव्हरमध्ये वरुण चक्रवर्तीने टिम सीफर्टला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. सीफर्टने १३ चेंडूमध्ये २४ धावांची खेळी केली.

## महाराष्ट्र पोलीस बॉईज...

अमोल सातपुते यांना देण्यात आले. यावेळी आपल्या पदाच्या माध्यमातून सर्वसामान्य युवकांचे प्रश्न व जनतेचे प्रश्न आपण सोडवणार असल्याचे प्रतिपादन सातपुते यांनी यावेळी म्हटले आहे. अमोल सातपुते यांची निवड होताच जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## आदिती तटकरेंची...

सेविकांकडून प्रत्यक्ष पडताळणी- महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती. काही कारणास्तव e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे.

## बाळासाहेबांच्या १०० व्या....

शिवसैनिकांसाठी आहे. मी बाळासाहेबांना विनम्र अभिवादन देतो. आजच्या निमित्ताने अनेक उपक्रम सुरू करण्याची घोषणा आम्ही करीत आहोत'.

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त केल्या जाणाऱ्या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं. यावेळी नव्या योजनांबद्दल घोषणा करताना त्यांनी सांगितले की, 'मुंबई महापालिकेच्या वतीने शासन आपल्या दारीच्या धर्तीवर बाळासाहेब ठाकरे आरोग्य आपल्या दारी अभियान राबविण्यात येणार आहे. पालिका क्षेत्रातील चांगल्या शाळांना १० लाख, ७ लाख आणि ३ लाखांची अनुक्रमे बक्षिसे देण्यात येतील. महिला बचत गटासाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर मुंबई महापालिकेकडूनही महिलांसाठी तरतूद करण्यात येणार आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी शंभर कोटींची तरतूद केली जाणार. बाळासाहेब ठाकरेंच्या जीवनावर आधारित शाळांमध्ये भव्य स्पर्धा आयोजित केल्या जातील. तसेच दहा हजार विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात येणार, 'एसटी संगे तीर्थाटन' या माध्यमातून सवलतीच्या दरात तीर्थक्षेत्र आणि गडकोट किल्ल्यांना जाता येणार आहे'.

## प्रभाग क्रमांक...

पुढाकाराने आणि बीड येथील सर्व द्वारकाधीश मित्र मंडळाच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे, गंभीर आजारांवर उपचार सर्वसामान्यांना मोफत उपलब्ध होतील. या सुवर्णसंधीचा लाभ प्रभाग क्रमांक ७ मधील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बीड जि. प....

रुजू होत नाही, तोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करू नयेत. नियमांचा बेकायदेशीर भंग- डॉ. ढवळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषदेतील कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र 'प्रतिनियुक्ती' हा शब्द टाळून 'अतिरिक्त कामकाज'च्या नावाखाली नियमांचा सर्रास भंग करण्यात आला.

विशेषतः शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असून, काही विभागप्रमुख सामान्य प्रशासन विभागाला डावलून थेट सीईओ यांच्या नावावर फाईल पाठवत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

सीईओ यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा काही अधिकारी घेत आहेत. १५० पेक्षा अधिक कर्मचारी महत्वाच्या टेबलांवर अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली बसले आहेत. यामागे हितसंबंध व सत्ताधारी गटांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले.

## बीड मधील ...

रोजी उपविभागीय दंडाधिकारी बीड तथा पोलीस पाटील पदभरती प्रक्रिया समितीच्या अध्यक्षा कविता जाधव यांनी सविस्तर जाहिरात अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यात आली आहे. बीड मधील पोलीस पाटील भरतीला सुरुवात झाली आहे. भरती प्रक्रिया राबवताना महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ आणि संबंधित निर्णयांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश बीड पाटोदा माजलगाव अंबाजोगाई पहिली या पाचही उपविभागी उपविभागातील उपविभागीय दंडाळीकांना देण्यात आले आहेत उपविभाग स्तरावरून अर्जाची छाटणी लेखी परीक्षा आणि मुलाखती पार पडतील लेखी परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच तोंडी परीक्षा घेतली जाणार आहे. भरतीचे सविस्तर वेळापत्रक वेळ पुढीलप्रमाणे १९ जानेवारी जाहिरात प्रसिद्धी व प्रवेश प्रक्रिया सुरू ३० जानेवारी अर्ज करण्याची शेवटची मुदत, २ ते ६ फेब्रुवारी अर्जाची छाननी व प्रवेशपत्र वाटप, २२ फेब्रुवारी लेखी परीक्षा, २४ फेब्रुवारी लेखी परीक्षेचा निकाल, २५ ते २८ फेब्रुवारी तोंडी परीक्षा, २ मार्च अंतिम निवड यादी तथा निकाल इच्छुक विद्याथ्यारनी अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधून आपला अर्ज दिनांक ३० जानेवारी पयरत भरावा असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## साठेबाजी करून...

युरिया साठा याचे माहिती फलक लावणे बांधकारक करण्यात यावे, शेतकऱ्यांची अडवणूक करून जास्तीच्या चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्यांची परवाना तत्काळ रद्द करण्यात यावा यासह आदी मागण्या शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे, शेतकरी पुत्र बाळासाहेब मोरे, शेतकरी पुत्र अनिल माने, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजू गायके, अर्जुन सोनवणे यांच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

## सरपंच वंदना...

रितीरिवाजानुसार तिळगूळ वाटप,हळदी-कुंकवासह विचारांची देवाणघेवाण करण्यात आली. सौ वंदना गायकवाड या संक्रातीनिमित्त दरवर्षी हळदी कुंकवाचा कार्यक्रम विविध सामाजिक उपक्रमाने नेहमीच साजरा करतात. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंचपती उद्योजक परिवंत गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## खात्यावर पैसे...

योगेशवरी नागरी सहकारी पतसंस्थेकडून डिसेंबर २०११ मध्ये रूपये १ लाख ५० हजार एवढे कर्ज घेतले होते. मात्र पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची नियमितपणे परतफेड न केल्याने घेतलेल्या कर्जाची थकीत रक्कम डिसेंबर २०१९ अखेर ३ लाख ५६ हजार ७११/- रूपये एवढी झाली होती. पतसंस्थेने कर्ज वसुलीसाठी वारंवार आठवण करून देऊन ही कर्जदाराने घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे हे कर्ज प्रकरण २९ जानेवारी २०२० रोजी न्यायालयात वर्ग करण्यात आले. न्यायालयाने हे प्रकरणात दोन्ही बाजूकडील सत्यतेची तपासणी करून आरोपी शेख अकबर शेख बाबर यांना सकृतदर्शनी दोषी ठरविले. शेख अकबर यांनी श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेकडून एक लाख पन्नास हजार रूपये कर्ज घेतल्याचे व्याजासह झालेल्या रूपये ३ लाख ५६ हजार ७११ /- रकमेची कर्जदारास मागणी केल्यास आरोपीने अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेचा रूपये २ लाख ९९हजार एवढ्या रकमेचा धनादेश तारीख टाकून स्वतः च्या स्वाक्षरीने पतसंस्थेस दिला. मात्र पतसंस्थेच्या वतीने आरोपीने दिलेला धनादेश बँकेत जमा केला असतांना आरोपीच्या खात्यावर अपुरी रक्कम असल्या कारणाने सदरील धनादेश न वटता ,तो बँकेच्या मेमोसह परत आला. तेव्हा थकीत रकमेसाठी पतसंस्थेच्या वतीने शेख अकबर यांना नोटीस रिंहींश्रळ मात्र पाठवलेली नोटीस न स्वीकारता परत पतसंस्थेकडे आली. या व अशा सर्व बाबींचा विचार करून माननिय न्यायालयाने शनिवार, दिनांक १७/०१/२०२६ रोजी आरोपीस दोषी ठरवून दोन महिने साधी कैद व ४,४८,५००/- रूपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. तसेच दंड न भरल्यास पुनः १० दिवसांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा ही आरोपी शेख अकबर शेख बाबर यास सुनावली आहे. पतसंस्थेच्या वतीने ॲड.आर.एन.गुप्ता यांनी माननीय न्यायालयात बाजू मांडली.

## मानवी जीवनात...

यांच्याकडे पाहिल्यावर समजते असे युवानेते सतिष आबा शिंदे यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले. यावेळी सरपंच परिवंत गायकवाड, मा. सरपंच केशव बांगर, मा. जालिंदर गायकवाड नेते, परमेश्वर नागरगोजे सेवा सोसायटी व्हा.चेअरमन , नातेवाईक आप्तेष्ट आदी उपस्थित होते.

## जन्म प्रमाणपत्र....

सही नसणे, नोटरी शपथपत्र नसणे आधार कार्ड व टिसी मधील जन्म तारखेतील तफावत असने अशे जवळपास २०० लोकांना ४१ए सीआरपीसी अंतर्गत नोटिसा बजावल्या आणि अटक फॉर्म भरून घेतले. हे सर्व दुरुस्तीयोग्य असतानाही पोलिसांनी अतिउत्साह दाखवल्याचा आरोप आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी पुढाकार घेतला. ते म्हणाले, नागरिकांनी ओळख लपवण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. तरीही त्यांना आरोपी ठरवणे हे अन्यायकारक आहे. मी सर्व पीडितांना एकत्र करून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे.सयय्द एजाज यांच्या नेतृत्वाखाली पीडितांनी एकजूट दाखवली आणि क्रिमिनल अर्ज क्रमांक ४६६१/२०२५ व ५०४८/२०२५ दाखल केले. यात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुदर्शन साळुंके आणि ॲड. महेंद्र गंडले यांनी अभ्यासपूर्ण युक्तिवाद केला. न्यायालयाने प्रकरणाची गांभीर्य ओळखून पोलिसांना म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावली. या संपूर्ण प्रक्रियेत ॲड. काझी मुखीमोद्दीन सैदोद्दीन यांचा कायदेशीर सल्ला महत्त्वपूर्ण ठरला. ते म्हणाले, हे प्रकरण किरकोळ त्रुटींवरून नागरिकांना गुन्हेगार करण्याचे उदाहरण आहे. आम्ही याचिकेत सर्व पुरावे सादर केले असून, न्यायालयाने आमच्या बाजूला लक्ष दिले आहे. काझी यांच्या मार्गदर्शनामुळे याचिका दाखल करण्यात पीडितांना मोठी मदत झाली. त्यांच्या अनुभवामुळे प्रकरण न्यायालयात प्रभावीपणे मांडले गेले. या घटनेने प्रशासकीय यंत्रणेच्या मनमानी कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सय्यद एजाज आणि काझी मुखीमोद्दीन सैदोद्दीन यांच्या प्रयत्नांमुळे पीडितांना न्याय मिळेल, अशी आशा आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी ६ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

## तुलसी महाविद्यालयाची....

महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातून यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्य दलात व विविध शासकीय सेवांमध्ये यश मिळवले आहे. पलकच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर साहेब यांचे 350 वे शहीदी समागम वर्ष: जिल्ह्यातील 2789 शाळांमध्ये दररोज प्रभात फेऱ्यांद्वारे जनजागृती



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद समागम वर्षानिमित्त त्यांचे कार्य व इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात विविध शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. जिल्ह्यातील २७८९ शाळांमध्ये दररोज प्रभात फेऱ्या आयोजीत करुन जनजागृती केली जात आहे, अशी माहिती जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील एकूण ३०७४ प्राथमिक शाळांपैकी २८९२ शाळेत प्रभात फेऱ्या घेतल्या आहेत, तर त्यातील २७८९ शाळेत दररोज प्रभात फेऱ्या घेण्यात येतआहेत. शिक्षणविभागाच्या माध्यमिक विभागाच्या एकूण १२७७ शाळांपैकी ११०२ शाळांचा तर उच्च माध्यमिक विभागातील १५७ शाळांपैकी १४१ शाळांचा या उपक्रमात सहभाग आहे. तसेच २८९२ प्राथमिक शाळांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांच्या जीवनावर स्पर्धा परीक्षा आयोजीत करुन गीत व डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. तर ११०२ माध्यमिक शाळेत व १४१ उच्च माध्यमिक शाळेत गुरुतेग बहादुर साहेबजी यांच्या जीवनावर स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या गीत व डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. तालुकास्तरीय स्पर्धा मंगळवार दि.२० रोजी संपन्न झाल्या असून आणि आज जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे निकाल संकलित करणे सुरू आहे. आज घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये गायन, चित्रकला,निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या. या स्पर्धांमधून गुरु तेग बहादूर यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळून जनजागृती होत आहे.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कार्यक्रम साजरा

**बीड । प्रतिनिधी**

मराठी भाषेचा प्रचार प्रसार आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभागाद्वारे दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा केला जातो.

कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश मा. श्री. एल. एस. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी कौटुंबिक न्यायालय, बीड येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा वापर रोजच्या न्यायालयीन कामकाजामध्ये जास्तीत जास्त





कसा करता येईल याबाबत महत्त्वाचे असे मार्गदर्शन कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष मा श्री एल. एस. चव्हाण साहेब यांनी केले.

कार्यक्रमाला लाभलेल्या प्रमुख पाहुण्या विधीज्ञ श्रीमती व्ही. बी. दळवी यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगत , बोलीभाषा ही किती महत्त्वाची आहे हे सांगितले. तसेच विधीज्ञ मनिषा गडकर यांनी मराठी भाषेचे ऐतिहासिक महत्व सांगितले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कौटुंबिक न्यायालयाच्या विवाह समुपदेशिक श्रीमती एस. व्ही. नागभिडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौटुंबिक न्यायालयाचे कनिष्ठ लिपिक श्री. सतीश वडमारे यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कौटुंबिक न्यायालयाच्या लघुलेखिका श्रीमती. एस. आर. निर्मळ यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक श्री शेंडगे, अधीक्षक श्री.अधापुरे, श्री.अनिल कुलकर्णी, श्री. मनीष जाडे, श्री परवेज व श्री.जोगदंड व श्री अक्षय जावळे यांनी प्रयत्न केले.

## २६ जानेवारी दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाची माहिती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०:०५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येथे होईल. बीड शहरातील सर्व सुजाण नागरिकांना या महत्त्वपूर्ण वेळी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले आहे, कारण हा दिवस आपल्या देशाच्या लोकशाहीचा



आणि स्वातंत्र्याचा गर्विष्ठ प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने, कृपया खालील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करण्याचे आवाहन करण्यात येते: कार्यक्रम २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:०५ वाजता प्रारंभ होईल. कृपया या वेळेस कार्यक्रम स्थळी उपस्थित राहण्याची तयारी करा. या ध्वजारोहणाचा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येथे होणार आहे, ज्याचे ऐतिहासिक महत्त्व सर्व उपस्थित व्यक्तींनी जाणून घेणे गरजेचे आहे. सर्व सुजाण नागरिकांना या विशेष प्रसंगाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपली उपस्थिती हा कार्यक्रम विशेष आणि भव्य बनवण्यास मदत करेल. तुमच्या सक्रिय सहभागामुळे या ध्वजारोहणाचा कार्यक्रम अधिक खास आणि संस्मरणीय बनणार आहे. चला तर मग, एकत्रितपणे या राष्ट्रीय उत्सवात सामील होऊन आपली एकता आणि राष्ट्रभक्ती व्यक्त करूया! भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पश्चिम, समता सैनिक दल, शासकीय संघ पोलीस अधिकारी कर्मचारी संघटना वकील संघ व इतर सामाजिक संघटनांनी केले आहे.

## रब्बी ई–पीक पाहणी नोंदणी ला राहिला आज शेवटचा दिवस

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

रब्बी हंगामातील ई–पीक पाहणी करण्याची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ पर्यंत असून, ही मुदत संपल्यानंतर ई–पीक पाहणी करता येणार नाही, याची सर्व शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन तहसीलदार शेळके यांनी केले. ई–पीक पाहणी ही शासनाच्या विविध योजनांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, शेतकऱ्यांनी याकडे दुर्लक्ष करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची ई–पीक पाहणी पूर्ण करून घ्यावी.

शासनाने शेतकरी स्तरावरूनच मोबाईलच्या माध्यमातून ई–पीक पाहणी नोंद करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी शेतकऱ्यांना तलाठ्यांकडे जाण्याची आवश्यकता नसून, ई–पीक पाहणी मोबाईलच्या साह्याने स्वतःच्या मोबाईलवरूनच आपल्या सातबारा उताऱ्यावर विविध पिकांची नोंदणी करता येणार आहे. शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या पीक विमा योजना, नैसर्गिक आपत्तीमुळे दिले जाणारे सानुग्रह अनुदान आदी लाभांसाठी पीक पेरणीची नोंद ई–पीक पाहणी पद्वारे करणे बंधनकारक आहे. ई–पीक पाहणी न केल्यास शासनाकडील अनुदान व इतर लाभ बाधित शेतकऱ्यांना मिळणार नाहीत, असेही तहसीलदार शेळके यांनी स्पष्ट केले.

## हिंदुहृदयसम्राटांना अभिवादन; 1986 पासूनचे जुने शिवसैनीक एकत्र



**बीड । प्रतिनिधी**

जुन्या शिवसैनीकांच्या वतीने शिवसेना प्रमुख, हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त बीड येथील विश्रामगृहात भावपूर्ण वातावरणात विनम्र अभिवादन करण्यात आले. १९८६ च्या सुरुवातीपासून शिवसेनेत कार्यरत असलेले जुने शिवसैनीक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित शिवसैनीकांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाच्या जोरदार घोषणा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या, अठरापगड जातीतील शिवसैनीकांना बाळासाहेब ठाकरे यांनी आमदार, खासदार, मंत्री घडवले. आज शिवसैनीकांची जी सामाजिक व राजकीय ओळख आहे, ती केवळ बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वामुळेच असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमात जुन्या आठवणींना उजाळा देत स्वर्गवासी विजयअण्णा बहीर, किसन जाधव, मधुकर देवकते, सखाराम काळे, प्रताप लाहोट, धायगुडे बाबा, गोकुळ फरताळे, कोंडीराम डहाळे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने ॲड. गोविंद शिराळे पाटील यांचा भव्य सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात लौकिक असलेल्या बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने नगरपरिषद बीड येथे स्वीकृत सदस्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल ॲड. गोविंद शिराळे यांचा भव्यदिव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर नियुक्ती ही कायदेविषयक पार्श्वभूमी, विधी विद्यापीठातून प्राप्त पदवी तसेच दहा वर्षे सहा महिन्यांच्या प्रदीर्घ वकिली अनुभवाच्या आधारे तसेच गेली तेरा वर्ष भाजपाच्या सक्रिय सदस्य



म्हणून तसेच गेल्या वीस वर्षापासून वडीलांच्या खांद्याला खांदा देवून सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रामध्ये काम केल्यामुळे भाजपच्या पक्ष नेतृत्वाने आदरणीय आमच्या नेत्या नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब, भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ देशमुख, माझे सर्वस्व दैवत माझे आदरणीय वडील भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ (अण्णा) शिराळे, बीड विधानसभा युवा नेते डॉ.योगेशभैय्या क्षीरसागर, बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर, राज्य कार्यकारिणी सदस्य ॲड.सर्जे राव (तात्या) तांदळे, बीड शहर अध्यक्ष अशोक लोढा, नागरगोजे सर यांनी संधी दिल्याबद्दल हा क्षण ॲड. गोविंद शिराळे यांच्यासाठी अत्यंत अभिमानाचा व कौतुकाचा ठरला. यावेळी बोलताना ॲड. गोविंद शिराळे यांनी सांगितले की, मी एक चांगला वकील व सक्षम अभिवक्ता म्हणून घडण्यासाठी माझ्या प्रॅक्टीस सुरुवात पुणे जिल्हा व सत्र न्यायालय व बीड जिल्हा वकील संघातील सर्व ज्येष्ठ वकील, सहकारी, सीनियर व ज्युनियर वकिलांचे मार्गदर्शन, त्यांचे अमूल्य सल्ले व सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे. माझी संपूर्ण जडणघडण ही पुणे आणि बीड वकील संघात झाली असून या संघाचा मी कायम कृतज्ञ राहील. या सत्कार समारंभास बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुभाष पिसुरे, उपाध्यक्ष ॲड.रघुराज देशमुख, सचिव ॲड. सुभाष काळे, कोषाध्यक्ष ॲड.योगेश टेकाडे,

## बाजीराव पाटील विद्यालयात बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, व त्यांना दैनंदिन व्यवहार कळावा या उद्देशाने तालुक्यातील जांब येथील बाजीराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय जांब या ठिकाणी बालगोपाळाच्या बाल आनंदी बाजारात मोठा प्रतिसाद मिळाल्याने २७ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली विद्यार्थ्यांनी हंगामी फळ भाजीपाल्यासह भेळ पापड, इडली, भजे, वडापाव, पाणीपुरी,सर्व भाज्या चे स्टॉल लावले होते. नाविन्यपूर्ण शैक्षणिक



उपक्रमांतर्गत शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य खाडे सर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक हावळे सर सरपंच अभिजीत खाडे,राजेंद्र नागरगोजे, राजेंद्र तांबारे, बन्सीधर पोकळे, अशोक सातपुते, अतुल सातपुते, अशोक नागरगोजे, जालिंदर सातपुते, शहादेव खंडागळे, सुरेश नागरगोजे, असे मान्यवर उपस्थित होते सर्व ग्रामस्थ शाळेतील सर्व शिक्षक मोरे सर, मिसाळ सर,जामकर सर, जायभाय,सर कराड सर, खेडकर सर, सोनवणे सर, ढास सर, मोराळे मॅडम , दहिफळे मॅडम, मस्के मॅडम, पिंपळे मॅडम, भांगे सर, शिवाजी खेडकर, भारत पवार,

## ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये ट्रॅडिशनल डे उत्साहात साजरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे दि. २३ जानेवारी २०२६ रोजी ट्रॅडिशनल डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थी साडी, धोतर, कुर्ता–पायजमा तसेच भारतातील विविध राज्यांच्या पारंपरिक पोशाखात सजले होते. रंगीबेरंगी वेशभूषेमुळे संपूर्ण महाविद्यालयीन परिसर सांस्कृतिक वातावरणाने नटून गेला होता. कार्यक्रमादरम्यान पारंपरिक नृत्ये, गीत सादरीकरण व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या प्राचार्य वेळापुरे सर व शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक करत भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

ट्रॅडिशनल डे निमित्ताने विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख जपण्याची व आनंदाने साजरा करण्याची संधी मिळाली.

## बाजीराव पाटील विद्यालयाची गजानन सहकारी साखर कारखाना येथे शैक्षणिक क्षेत्रभेट

**बीड । प्रतिनिधी**

स्फूर्ती शिक्षण संस्था जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब तालुका शिरूर कासार विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले श्री क्षेत्रभेट विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमाचा व प्रात्यक्षिक परीक्षेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आले या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना साखर उद्योगाची प्रत्यक्ष कार्यपद्धती

## लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात गणेश जयंती निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व लाभलेल्या लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानच्या वतीने गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत श्रीमत गणेश



महापुराण कथा तसेच पंचकुंडी गणेश यज्ञ यास दि. १६ जानेवारी शुक्रवारपासून विधिवत प्रारंभ झाला असून परिसरात भक्तिभाव व अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. देवस्थान समितीच्या वतीने दरवर्षी गणेश जयंतीनिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. आज दि. २२ गुरुवार रोजी सकाळी मन्मथ स्वामी संस्थानचे मठाधिपती व सुप्रसिद्ध प्रवचनकार डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते भाविक भक्तांच्या उपस्थितीत गणेश जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांनी श्री गणेश जन्मकथेचे सविस्तर वर्णन करून प्रवचनातून भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले.

**परिशिष्ठ -4**

अवसायक (खालील तपशिला प्रमाणे)
संलग्न, सहायक निबंधक, सहकारी संस्था
ता. केज, जि.बीड
दि. 23 /01/2026.

मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. केज, जि.बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 102 मधील तरतूदीन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिम आदेश निर्गमित केलेले असून त्यावर खालील तपशिलाप्रमाणे अवसायकांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम 1961 मधील नियम 89 (4) मधील तरतूदीप्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्व संबधीतांना याव्दारे नोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीसचे दिनांकापासून **दोन** (02) महीन्याच्या आत त्यांचे येणे रक्कमेबाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबधीत अवसायकाकडे दाखल करावे, आणि देणे रक्कम तात्काळ संबधीत अवसायकाकडे जमा करावयात वरील मूदतीत संस्थेचे देणे / येणे रक्कमांचे अनुषंगाने संबधीत अवसायकाकडे पुराव्यानिशी कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणचेही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रक्कमासंबधीत अवसायकाडे जमा न केल्यास त्या कायदयातील तरतूदीप्रमाणे वसूल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मूदतीनंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अवसायनाचा अंतिम आदेश दिनांक | घेण्यात येणा-या अंतिम सभेचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर गृहनिर्माण भाडेकरु मालकी हक्क स.सं.म.उंदरी | श्री. एस.डी.नेहरकर,स.नी.स.सं.केज | 08.01.2016 | 24.03.2026 |
| 2 | श्री दत्त जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी गृहनिर्माण सं.म.केज | श्री. एस.डी.नेहरकर,स.नी.स.सं.केज | 08.01.2016 | 24.03.2026 |
| 3 | मागासवर्गीय सिध्दार्थ नगर गृहनिर्माण.सह.सं.म.जाधवजवळा | श्री.बी.बी.पवार, स.अ.श्रे-2 | 08.01.2016 | 24.03.2026 |
| 4 | क्रांतीसुर्य मागासवर्गीय औद्यो.उत्पादक सह.संस्था म.पैठण (सा) | श्रीम.वहावळे एम.एस.मु.ली. | 30.12.2022 | 24.03.2026 |
| 5 | गुरुदेव शिक्षक सह.भाडेकरु मालकी हक्क गृहनिर्माण सं.म.केज | श्री.बी.बी.पवार, स.अ.श्रे-2 | 08.01.2016 | 24.03.2026 |
| 6 | जयभवानी ग्रामउद्योग औद्योगिक उत्पादक सह.संस्था म.डोणगांव | श्री.एस.एच.बनसोडे, स.अ.श्रे-2 | 08.01.2016 | 24.03.2026 |
| 7 | संघनायक मागासवर्गीय औद्यो.उत्पादक सह.संथा म.होळ | श्रीम.वहावळे एम.एस.मु.ली. | 13.02.2023 | 24.03.2026 |
| 8 | होळेश्वर विद्यालय कर्म.सह.पतसंस्था म.होळ | श्री.बी.बी.पवार, स.अ.श्रे-2 | 13.02.2023 | 24.03.2026 |
| 9 | बालाजी अभिनव सहकारी संस्था म.आडस ता.केज जि.बीड | श्रीम.वहावळे एम.एस.मु.ली. | 17.10.2024 | 24.03.2026 |

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको, ऋणको यांना याव्दारे असेही सूचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीकोणातून अंतिम सभा वर नमुद केलेल्या दिनांकास सकाळी ठिक 11.00 वाजले पासून सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.केज, जि.बीड येथे ठेवण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थांच्या सर्व सभासद, धनको, ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यासह जर राहावे. सदर सभेमध्ये अवसायन कामकाजाचा अहवाल व संस्था नोंदणी रद्द करणेबाबतचा विचार विनिमय केला जाणार आहे यांची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

श्री. एस.डी.नेहरकर,
सहाय्यक निंबधक सहकारी संस्था केज

श्रीम.वहावळे एम.एस.मुख्य लिपीक
संलग्न सहाय्यक निंबधक सहकारी संस्था केज

श्री.एस.एच.बनसोडे, स.अ.श्रे-2
सहाय्यक निंबधक सहकारी संस्था केज

श्री.बी.बी.पवार, स.अ.श्रे-2
संलग्न सहाय्यक निंबधक सहकारी संस्था केज

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ •



*महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कार २०२५- २६. महाराष्ट्र शासन वन विभाग सातारा वन परिक्षेत्र फलटण जागतिक वनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या वेळी उपवनसंरक्षक मा.श्री.आदिती भारद्वाज यांच्या हस्ते वन्यजीव रक्षक जितेन सोनवणे यांना वनश्री पुरस्कार देऊन यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाठ्य पुस्तकातील कवी हनुमंत चांदगुडे होते. सहाय्यक वनसंरक्षक रो.ही.यो वन्यजीव दिगंबर जाधव वनक्षेत्र पाल सचिन रघतवान नियमक्षेत्र वन अधिकारी राहुल निकम लक्ष्मण शिंदे सचिन जाधव गणेश माने विविध सामाजिक संघटना या कार्यक्रमात सहभागी होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल निकम यांनी केले तर सचिन रघतवान यांनी आभार मानले*

# साठेबाजी करून युरिया जादा दराने विकणाऱ्यांवर कारवाई करा

## शेतकरी हक्क मोर्चाची कृषी अधिकाऱ्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी अतिवृष्टीने होरपळून निघाला आहे या वर्षी कापूस व सोयाबीन काढून ज्वारी, बाजरी, गहू, भईमुग, घेऊन कुठेतरी आशेचा किरण पाहत असताना व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक युरियाचा साठा करून कृत्रिम तुटवडा निर्माण करत आहेत. तसेच जादा दराने युरियाची विक्री करत असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने करण्यात आली.




युरिया खताची साठेबाजी करून शेतकऱ्यांना २६६ रुपये किमतीचा युरिया ४०० ते ५०० रुपये किमतीने विकला जात आहे, हे दुर्दैवी आहे. युरिया खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या व चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनवर तत्काळ कारवाई करण्यात यावी या मागणी करिता शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. युरियाचा साठेबाजी करून कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, जास्तीच्या चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, प्रत्येक व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक यांनी उपलब्ध ▶▶ उर्वरित पान २ वर

## सरपंच वंदना गायकवाड यांच्याकडून हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथे व आष्टी येथील निवासस्थानी मकरसंक्रांतीनिमित्त आमदार सुरेश धस यांचे खंद्दे समर्थक परिवंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच वंदना परिवंत गायकवाड यांच्यावतीने हळदी-कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. महिलांमध्ये स्नेह, एकोपा व सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला परिसरातील महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात मकरसंक्रांतीच्या पारंपरिक ▶▶ उर्वरित पान २ वर

## खात्यावर पैसे नसतांनाही पतसंस्थेस धनादेश दिला ; धनादेश न वटल्यामुळे आरोपीस दोन महिने कैद व ४ लाख ४८ हजार ५०० रूपये दंड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील श्री योगेशवरी नागरी सहकारी पतसंस्थेकडून शेख अकबर शेख बाबर यांनी २०११ साली १ लाख ५० हजार रूपयांचे कर्ज घेतले होते. घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड न केल्याने २०१९ अखेर त्याच्याकडे ३ लाख ५६ हजार ७११ रूपये व्याजासह येणे बाकी होते. १३ जाने २०२० रोजी थकीत रकमेपोटी २ लाख ९९ हजार रूपयांचा अंबाजोगाई पिपल्स बँकेचा धनादेश शेख अकबर यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने दिला. मात्र सदर धनादेश पतसंस्थेचे खाते असलेल्या अंबाजोगाई पिपल्स बँकेत जमा केला असताना त्या खात्यावर पुरेशी रक्कम नसल्याने सदरील धनादेश वटला नाही. संस्थेने त्यांच्याकडे धनादेशवारील रकमेची मागणी नोटीस पाठवली असतांना त्या नोटीसीचा शेख अकबर यांनी अस्वीकार केल्याने हे प्रकरण पतसंस्थेला न्यायालयात दाखल करावे लागले. खात्यावर रक्कम नसतांनाही धनादेश दिल्या प्रकरणी आरोपी शेख अकबर शेख बाबर यांना दोन महिने साधी कैद, ४ लाख ४८ हजार ५०० रूपयांचा दंड व दंड न भरल्यास १० दिवस अतिरिक्त कारावास अशी शिक्षा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अंबाजोगाई यांनी सुनावली आहे.

याप्रकरणी माहिती अशी की, शेख अकबर शेख बाबर यांनी श्री. ▶▶ उर्वरित पान २ वर

## मानवी जीवनात सोळा संस्कार महत्त्वाचे असतात :ह.भ.प. राजदीप महाराज आंधळे शास्त्री

### कै. कचरु नागरगोजे यांनी मुलांना सुसंस्कार दिले - युवा नेते सतिष आबा शिंदे



**आष्टी । प्रतिनिधी**

गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, अन्नप्राशन, डाकर्म ,कर्णवेध, विद्यारंभ, उपनयन, वेदारंभ, केशांत ,समावर्तन, विवाह, अंतेष्टी असे सोळा संस्कार होत असतात यामधील पाच संस्कार हे आईच्या पोटात तर इतर जन्मानंतर होतात असे ह.भ.प. राजदीप महाराज आंधळे शास्त्री यांनी कऱ्हेवडगाव येथील कै. कचरु साहेबराव नागरगोजे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित केलेल्या प्रवचन सेवेत उपस्थितांना संबोधित करताना सांगितले. तर कै. कचरु नागरगोजे यांनी मुलांना सुसंस्कार दिल्याने समाजात कसे वावरावे याची जाणीव लहू नागरगोजे, व राम नागरगोजे ▶▶ उर्वरित पान २ वर



*मौजे पिंपळनेर येथील श्री आशापुरक गणपती मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या किर्तनप्रसंगी उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले. यावेळी श्री आशापुरक गणपतीचे तसेच श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील मठाधिपती महंत श्री नवनाथ बाबांचे मनोभावे दर्शन घेतले. ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांच्या सुश्राव्य व प्रेरणादायी कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. या पवित्र प्रसंगी माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित तसेच माझ्यासह सर्व सहकारी,संत-महंत,महाराज मंडळी,गावातील माता भगिनी,ज्येष्ठ मंडळी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..!*




*माजलगाव - शहरामध्ये शुक्रवारी महर्षी कन्व मुनी यांचा जन्म दिवस राम मंदिर भट गल्ली येथे साजरा करण्यात आला. त्यानिमित्त वेदोक्त व शास्त्रोक्त पध्दतीने आराधना करून माजलगाव शहरातील सर्व यजुर्वेदीय कन्व ब्रम्हनंदानी त्यांची जयंती साजरी केली. यावेळी विजय जोशी आडगावकर, चंद्रकांतराव जाव्रस, अभयराव जाब्रस, अनंतराव पुसरेकर, श्रीधरराव आडगावकर, सुरेश भाले यांची उपस्थिती होती.*

## हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाचा संघटन करून त्यांना ताकद देण्याचे काम केले : आमदार प्रकाश दादा सोळंके

### जन्म शताब्दी वर्षानिमित्त माजलगावात बाळासाहेबांचे स्मारक उभारू ; बाळासाहेब ठाकरे यांची माजलगावात जयंती उत्साहात साजरी ; ज्येष्ठ शिवसैनिक नवनिर्वाचित नगरसेवकांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख कैलासवासी बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाचे मोठे संघटन तयार करून त्यांना ताकद देण्याचे काम केले आहे आणि राज्यात आज जे युतीचे सरकार आहे ते ठाकरे मुळेच असल्याचे सांगत जन्म शताब्दी वर्षानिमित्त बाळासाहेबांचे स्मारक माजलगावात उभारणार असल्याचे मत माजलगाव चे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी व्यक्त केले आहे. शिवसेना युवा सेना यांच्या वतीने माजलगावात चुन्मा चौक येथे हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आमदार सोळंके बोलत होते. जयंतीनिमित्त शिवसेनेच्या वतीने माजलगाव येथील ज्येष्ठ शिवसैनिक व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान



करण्यात आला या या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष साहिल भैया चाऊस,भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके नितीन राव नाईक नवरे डॉक्टर अशोक तिडके जयदत्तराव नरवडे दीपक मेंडके अभय होके पाटील नारायणराव होके भागवतराव भोसले पत्रकार कमलेश परमेश्वर सोळंके बाळासाहेब आढागळे बाबुराव तिडके आदींनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे यांनी केले होते या कार्यक्रमास धोंडीराम जाधव माऊली कदम रामभाऊ सावंत सुरेश नवले जय सुतार नारायणराव चांदबोदले, महादेव सुरवसे रामेश्वर काशीद संतोष देवकते सचिन कराळे, सलीम अत्तार राजेश चव्हाण राहुल बावणे किशोर झुंजुर्के विलास नेमाने राजेश कोंबडे आदी उपस्थित होते.

## जन्म प्रमाणपत्र प्रकरणात मोठा दिलासा : सय्यद एजाज यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद खंडपीठात एफआयआर रद्द करण्यासाठी रिट, पोलिसांना हायकोर्टाची नोटीस

**तलवाडा । प्रतिनिधी**

जन्म प्रमाणपत्रांच्या अर्जातील किरकोळ त्रुटींमुळे गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणात अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज इफ्तेखार अहमद यांच्या नेतृत्वाखाली मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांद्वारे गुन्हा रजिस्टर क्रमांक २५६/२०२५ पोलिस स्टेशन गेवराई मधील एफआयआर रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून, न्यायालयाने पोलिस प्रशासनाला नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.



या प्रकरणात सय्यद एजाज आणि अँड. काझी मुखीमोद्दीन यांची भूमिका निर्णायक ठरली असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे शेकडो नागरिकांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकरणाची सुरुवात गेवराई तहसील कार्यालयात झाली. येथे जन्म प्रमाणपत्रांसाठी अर्ज दाखल करणाऱ्या नागरिकांनी आधार कार्ड आणि शाळेच्या टीसीमधील जन्मतारखेच्या तफावती दूर करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया अवलंबली होती. मात्र, तहसीलदारांनी संचिकांची फेरतपासणी न करता आणि अर्जदारांना बाजू मांडण्याची संधी न देता थेट गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. यानुसार गेवराई पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला. सुरुवातीला १७ आरोपी करण्यात आले, पण तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक दीपक लंके यांनी किरकोळ त्रुटींवरून असे की, अर्जावर ▶▶ उर्वरित पान २ वर

## तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पलक सावंतची देशसेवेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील बीसीए तृतीय वर्गाची विद्यार्थिनी पलक सूरज सावंत हिची नुकतीच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) मध्ये निवड झाली असून पहिल्याच प्रयत्नात तिने हे यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. पलक सावंत सध्या बीसीएच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असून पदवीचे



शिक्षण घेत असतानाच तिने देशसेवेचे ध्येय उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत देण्यात येणारे नियमित मार्गदर्शन आणि तिची स्वतःची मेहनत यांच्या जोरावर तिने सीमा सुरक्षा दलाच्या परीक्षेत यश मिळवले. पलकच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तुलसी शैक्षणिक समूहचे संचालक मा.प्रा. प्रदीप रोडे, मुख्याध्यापक मा.राम वाघुंबरे, मा.अतुल मुळे,मा. प्रा.अर्जुन राठोड तसेच प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांच्या हस्ते पलकचा प्रेरणादायी पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि तिच्या मेहनत व चिकाटीचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जेष्ठ शिवसैनिकांचा सन्मान

**वडवणी । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभरव्या जयंती निमित्त शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी बाळासाहेब ठाकरे अमर रहें, जय भवानी जय शिवाजी, जय महाराष्ट्र अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि समाजहितासाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुकाप्रमुख, याच्या वतीने विनायक बप्पा मुळे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सर्व जेष्ठ शिवसैनिकांचा गौरव करण्यात आला. या वेळी उपस्थित शिवसेना





वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, युवराज शिंदे, महादेव आंधळे, राष्ट्रवादी शरद पवार गट तालुका अध्यक्ष महादेव जमाले, युवासेना उपजिल्हा प्रमुख वचिष्ट शेंडगे,सरपंच संजय धपाटे, बंडू मामा जाधव, महेश जाधव, बाबासाहेब राऊत,महादेव सातपुते, रामेश्वर जेधे, नवनाथ मोरे, उपतालुका प्रमुख अशोक गोंडे, मस्के, रामप्रसाद चव्हाण, अशोक सावंत, सुभाष नाना डांबे, रामराव सावंत सरपंच, नारायण दादा शिंदे, महादेव बापु आंधळे, सर्जे राव जोगदंड, कैलास गोंडे, लक्ष्मण धोत्रे, बीबीसेन भाऊ मस्के, कैलास गोंडे, बालासाहेब मदणे, पांडुरंग मस्के, शेमशोदिन शेख,लक्ष्मण सावंत ई.जेष्ठ शिवसैनिक यांचा सन्मान उत्साहात करण्यात आला, यावेळी उपस्थित सर्व पत्रकार बांधव उपस्थित सर्व शाखा प्रमुख शिवसैनिक उपस्थित होते.